## मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

तात्काळ/निवडणूक प्राथम्य

क्र.आआसं-२०२४/प्र.क्र.१६/निवडणूक-११
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

(१) विभागीय आयुक्त, (सर्व)
(२) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय** :- सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०२४ व १६-नांदेड लोकसभा मतदार संघाच्या पोटनिवडणूकीसाठी आदर्श आचार संहिता लागू झाल्यानंतर करावयाची कार्यवाही.

**संदर्भ** :- भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४३७/६/१/INST/ECI/ FUNCT/ MCC/ २०२४ दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४

**महोदय / महोदया,**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ व १६-नांदेड लोकसभा मतदार संघाच्या पोटनिवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५.१०.२०२४ च्या प्रसिध्दीपत्रकान्वये घोषित केला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | तपशिल | कार्यवाहीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | २२.१०.२०२४ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम | २९.१०.२०२४ (मंगळवार) |
| ३ | नामनिर्देशन पत्राची छाननी | ३०.१०.२०२४ (बुधवार) |
| ४ | उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ०४.११.२०२४ (सोमवार) |
| ५ | मतदानाचा दिनांक | २०.११.२०२४ (बुधवार) |
| ६ | मतमोजणीचा दिनांक | २३.११.२०२४ (शनिवार) |
| ७ | निवडणूक प्रक्रिया पुर्ण होण्याचा दिनांक | २५.११.२०२४ (सोमवार) |

२. सदर सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रस्तुत प्रसिध्दीपत्रकाच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. सदर प्रसिध्दी पत्रकाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. भारत निवडणूक आयोगाच्या आचारसंहिते संदर्भातील Compendium of Instructions on Model Code of Conduct & Manual on Model Code of Conduct, वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQ's), काय करावे व काय करु नये (DOs & DONT's) आणि Expenditure Monitoring, Paid News संदर्भातील सर्व मार्गदर्शक सूचना व स्थायी आदेश लागू झालेले आहेत.

३. भारत निवडणूक आयोगाने संदर्भाधीन दिनांक १५/१०/२०२४ च्या पत्रान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ व १६-नांदेड लोकसभा मतदार संघाच्या पोटनिवडणूकीचा जाहिर झाल्यानंतर करावयाच्या कार्यवाही बाबत सविस्तर सूचना दिलेल्या आहेत (सुलभ संदर्भासाठी प्रत संलग्न). त्यानुसार पुढील महत्त्वाच्या विषयांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे.